**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑपरेशन सिंदूरद्वारे दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्यांना, तर ऑपरेशन महादेवद्वारे पहलगाम हल्ला करणाऱ्यांना जमीनदोस्त केल्याचं अमित शहा यांचं प्रतिपादन

- झारखंडमधे रस्ते अपघातात सहा कावडयात्रींचा मृत्यू, २४ जण जखमी

- उत्तराखंड, बिहार, दिल्लीला जोरदार पावसाचा फटका, हिमाचल प्रदेशात पुराच्या पाण्यात दोघांचा मृत्यू दोघे बेपत्ता

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ला पाच वर्षं पूर्ण

**आणि**

- चीनमधे बिजींग इथं झालेल्या जोरदार पावसामुळे ३० जणांचा बळी

**<><><><><>**

भारताच्या सशस्त्र दलांनी एकीकडे ऑपरेशन सिंदूरद्वारे दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्यांना जमीनदोस्त केलं, तर दुसरीकडे लष्कर आणि सशस्त्र दलांनी ऑपरेशन महादेवद्वारे पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांची हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांना संपवलं, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज लोकसभेत सांगितलं. ऑपरेशन सिंदूरवर लोकसभेत काल सुरू झालेल्या चर्चेत त्यांनी आज भाग घेतला. ऑपरेशन महादेव अंतर्गत काल काश्मीरमध्ये मारले गेलेले तीन दहशतवादी, सुलेमान, अफगाण आणि जिब्रान, हे लष्कर ए तैयबाचे अ श्रेणीचे कमांडर असून पहलगाम हल्ल्यात सामील असल्याचे ठोस पुरावे तपास यंत्रणांकडे असल्याचा दावा त्यांनी केला. सशस्त्र दलांच्या या कामगिरीवर संपूर्ण देशाला अभिमान आहे, मात्र विरोधी पक्षांना मात्र याचा आनंद झालेला नाही, अशी टीका त्यांनी केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यापासून ते ऑपरेशन सिंदूरपर्यंत झालेल्या घडामोडींची

तपशीलवार माहिती त्यांनी सदनाला दिली. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानात १०० किलोमीटर आत घुसून नियंत्रित हल्ल्याद्वारे ९ दहशतवादी तळ भारतानं लक्ष्य केले, यात एकही सामान्य नागरिक ठार झाला नाही, मात्र १००पेक्षा जास्त दहशतवादी मारले गेले, यात जैश-ए-मोहम्मदच्या अनेक महत्त्वाच्या दहशतवाद्यांचाही समावेश होता, असा दावाही शहा यांनी केला. युद्ध का थांबवलं, असा प्रश्न विरोधकांनी विचारला, मात्र युद्धाचे गंभीर परिणाम असतात, असं मत शहा यांनी मांडलं.

**<><><><><>**

राज्यसभेत आज विविध मुद्द्यांवर विरोधकांच्या गदारोळामुळे सदनाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर उपाध्यक्ष हरिवंश यांनी शून्य प्रहर पुकारला, मात्र विरोधी बाकांवरच्या सदस्यांनी बिहार मतदार यादी सखोल पुनरीक्षणासह इतर मुद्द्यांवर चर्चा घ्यायची मागणी करत सभागृहात गदारोळ केला. विविध राजकीय पक्षांकडून एकंदर २४ स्थगन प्रस्ताव मिळाल्याची आणि ते फेटाळल्याची माहिती उपाध्यक्षांनी सभागृहाला दिली. गदारोळ सुरूच राहिल्यानं त्यांनी कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केलं.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषेचं उल्लंघन केल्याप्रकरणी पाच भारतीय मच्छिमारांना श्रीलंकेच्या नौदलानं आज ताब्यात घेतलं. हे मच्छिमार कच्छतिवू इथं मासेमारी करत होते, तेव्हा श्रीलंकेच्या गस्ती पथकाने त्यांना अडवलं आणि त्यांच्या नौका जप्त केल्या असं  स्थानिक मच्छिमार संघटनेनं सांगितलं.

**<><><><><>**

झारखंडमधल्या मोहनपूर गटातल्या देवघर-हंसदिहा रस्त्यावर आज सकाळी बस आणि ट्रकच्या अपघातात सहा कावडयात्रींचा मृत्यू झाला, तर २४ जण गंभीर

जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात  आलं आहे. मात्र जखमींची प्रकृती गंभीर असून मृतांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याचं सांगितलं जात आहे. हे कावडयात्री बसमधून देवघरला जात होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त करत हा अपघात दुःखद असल्याचं म्हटलं आहे. तसंच जखमी लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना केली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या धुळे जिल्ह्यात शिरपूर तालुक्यात मुंबई-आग्रा महामार्गावरच्या दभाषी फाटा येथे आज सकाळी एका एसटी बसला झालेल्या अपघातात एका शाळकरी मुलीचा मृत्यू झाला असून २२  जण जखमी झाले. शिरपूरला हून शिंदखेडा जाणाऱ्या या एसटीला एका ट्रकने पाठीमागून धडक दिल्यानं हा अपघात झाला. जखमी प्रवाशांना शिरपूरच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यातल्या ४ जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना धुळे इथल्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन आज साजरा होत आहे. वाघांचा नैसर्गिक अधिवास सुरक्षित ठेवणं, वाघांच्या संवर्धनासाठी जगभरात होत असलेल्या प्रयत्नांना पाठिंबा देणं आणि याबाबत जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २९ जुलै हा दिवस व्याघ्रदिन म्हणूना साजरा केला जातो. या निमित्ताने केंद्रीय पर्यावरण, वनं आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे वाघाच्या संवर्धनात भारताने केलेल्या उत्तम कामाकडे लक्ष वेधलं. देशभरातल्या ५८ व्याघ्र प्रकल्पांमध्ये एकंदर ३ हजार ६८२ वाघ असून व्याघ्र संवर्धनात भारतानं एक आदर्श घालून दिल्याचं त्यांनी नमूद केलं. व्याघ्र दिनाच्या निमित्ताने सिंह यांनी नवी

दिल्लीतल्या राष्ट्रीय प्राणीशास्त्रीय उद्यानात एका कार्यक्रमातही भाग घेतला आणि इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्समध्ये भारत करत असलेलं काम अधोरेखित केलं.

**<><><><>**

हिमाचल प्रदेशातील मंडी इथं काल रात्री सततच्या पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून यात दोघांचा मृत्यू झाला तर दोघे जण बेपत्ता आहेत. बेपत्ता असलेल्यांचा शोध बचाव पथकं घेत आहे. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुक्खु यांनी घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून परिस्थितीचा आढावा घेतला. बचावकार्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असून मदतकार्य जलदगतीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**उत्तराखंड**मध्ये काल रात्रीपासून पावसाचा जोर कायम आहे. हवामान विभागानं राज्यातल्या बहुतांश जिल्ह्यात यलो अलर्ट जारी केला असून नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे. अलमोडा, बागेश्वर, चमोली, देहराडून, हरीद्वार, पौरी, नैनीताल, रुद्रप्रयाग, तेहरी आणि उत्तरकाशी या जिल्ह्यांमधे पूरपरिस्थीती निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या प्रदेशात खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**बिहार**मधे पटना इथं रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे वाहतूक विस्कळित झाली आहे. त्यामुळे अनेक शाळांना आज सुट्टी देण्यात आली आहे. बिहारमधल्या अनेक जिल्ह्यांमधे २ ऑगस्टपर्यंत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**राजधानी** दिल्लीत मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचलं असून वाहतूक विस्कळित झाली आहे. पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे, तसंच हवेच्या गुणवत्तेतही सुधारणा झाली आहे. हवेची ही गुणवत्ता पुढच्या आठवड्यातही कायम राहील असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

आजपासून ३ ऑगस्टपर्यंत आकाश ढगाळ राहील, तसंच अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू होऊन आज पाच वर्षं झाली. देशातल्या शाळांची एक इमारत ही ओळख बदलून केवळ पुस्तकी शिक्षण, गुण आणि पाठांतर यांच्या पलिकडील ज्ञान मिळवण्याचं अवकाश अशी ओळख घडवण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा हा पथदर्शी आराखडा आहे. गेल्या पाच वर्षांत या धोरणामुळे अधिक समावेशक, विद्यार्थी केंद्रित आणि भविष्यासाठी अनुकूल शिक्षण पद्धतीचा पाया रचला गेला आहे. सर्व राज्यांमध्ये शिक्षण क्षेत्रात नवीन धोरणाचा प्रभाव दिसून येत आहे. निपुण भारत आणि विद्या प्रवेश या उपक्रमांचा ४ कोटींपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे. बाल वाटिका, जादुई पिटारा आणि प्रशस्त ॲप या उपक्रमांमुळे बहुभाषी, समावेशी आणि समग्र शिक्षणाला प्रोत्साहन मिळत आहे. मुली आणि विशेष गरज असलेल्या मुलांना मदत, भारतीय भाषांना प्रोत्साहन तसंच क्षेत्रिय विभाजन कमी करण्याचे प्रयत्न याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याला आपलं ध्येय साध्य करण्याची संधी देणारं हे नवीन शैक्षणिक धोरण आहे.

**<><><><><>**

चीनमधे बिजींग इथं झालेल्या जोरदार पावसामुळे किमान ३० जणांचा मृत्यू झाला. बिजींगच्या ईशान्येकडील मियुन आणि यांगगींग भागात विक्रमी पाऊस झाला. या दोन्ही भागातल्या ८० हजाराहून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. पावसामुळे ३१ महामार्ग बाधित झाले असून १३६ गावांचा वीजपुरवठा बंद पडला आहे. बिजींगच्या प्रशासनानं शहरातल्या लोकांना सतर्क राहण्याचा आणि पाण्याच्या प्रवाहापासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे.

**//<><><><><>//**